**महाराष्ट्र शासन**
**इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**
**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था**
**(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022**
**दुरध्वनी क्रं.** 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 **ई मेल** - mahajyotingp@gmail.com

**जा.क्र.** महाज्योती/पीएचडी तक्रार समिती/नागपूर/2492/2024-25 दिनांक - 01.10.2024

## परीपत्रक

**विषय :- महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती 2023 या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांच्या प्रारुप अपात्र यादीवर येणाऱ्या आक्षेपांबाबत.**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था नागपूर मार्फत महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती - २०२३ करिता १४५२ अर्ज प्राप्त झालेले होते. त्यापैकी १३८१ विद्यार्थी कागदपत्र पडताळणी करण्याकरीता पात्र असुन दि.०७ ऑगस्ट २०२४ ते २२ ऑगस्ट २०२४ या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांना कागदपत्रे पडताळणीकरीता कार्यालयात बोलाविण्यात आले. त्यानुसार विद्यार्थ्यांच्या प्रारुप पात्र यादी, प्रारुप अपात्र यादी व प्रारुप गैरहरज यादी अशा तीन याद्या महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्या.

प्रारुप अपात्र यादीमधील विद्यार्थ्यांना कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास विद्यार्थ्यांनी लेखी स्वरुपात आक्षेप व त्याबाबत सबळ पुरावे घेवून तक्रार निवारण समितीसमोर दि.०७.१०.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर या कार्यालयात उपस्थित रहावे.

दि.०७.१०.२०२४ नंतर कुठल्याही प्रकारचे आक्षेप स्विकारले जाणार नाही, याची प्रारुप अपात्र यादीतील विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

-स्वा-
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर